The Walt Disney Company

# च्या पुरवठा शृंखलेची आचारसंहिता

©DISNEY

# ओळख

गेले अनेकवर्ष आम्ही आमचे पाहुणे, प्रेक्षक, ग्राहक आणि भागधारक लोकांचा विश्वास कमावला आहे. आम्ही जिथं काम करू तिथं आमच्या उच्चमूल्यांप्रती असलेली निष्ठा सर्व ठिकाणी काम करण्याची आमची क्षमता यांच्या जोरावर आम्ही हा विश्वास कमावला आहे.

Disney जगभर आपला व्यवसाय करताना व वाढवताना मानवी मूल्यांचा आदरकरणे, पृथ्वीचे संरक्षण /संवर्धन करणे आणि पुढील पिढ्यांसाठी सकारात्मक पर्यावरणाचा वारसा निर्माण करणे या तत्त्वांशी वचनबद्ध आहे. आम्ही जगभरातील अशा पुरवठादारांशी सहयोगाच्या शोधात आहोत की जे प्रतिकूल मानवीहक्क परिणाम प्रबंधित, सौम्य करणे आणि त्यावर उपाय शोधणे तसेच आमच्या कामाचे, उत्पादनांचे, सेवांचे आणि पुरवठासाखळीचे पर्यावरणावरील परिणाम कमी करतील, अशा ज्या अपेक्षा इतर जबाबदार व्यवसायाकडून अपेक्षित म्हणून impact.disney.com वर उपलब्ध आहेत.

आम्ही मानवीहक्कांविरूद्ध प्रभाव पाडणा-या बाबींवर प्रतिबंध, उपाय तसेच आमचे परिचालन कार्यामुळे, उत्पादने, सेवा आणि पुरवठा शृंखला यांमुळे पर्यावरणावर होणारे परीणाम कमी करणे, यासाठी जगभरातल्या अशा पुरवठादारांच्या सहभागाच्या शोधात असतो.

आम्ही अशा लोकांना पुरवठादारांमध्ये अंतर्भूत करतो की ज्या व्यक्ती किंवा संस्था Disney कंपनीचे अधिग्रहिन, अधिकृत परवाना असलेले माल, घटक, उत्पादन, किंवा सेवा यांची तरतूद या कामांत गुंतलेले आहेत. आम्ही अपेक्षा करतो अशा सर्व पक्षकार संयुक्त राष्ट्र संघाच्या Guiding Principles on Business and Human Rights आणि आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने उद्धृत केलेल्या Fundamental Principles and Rights at Work आणि आर्थिक सहयोग व विकास संघटनेच्या Guidelines for Multinational Enterprises या सर्वांना अनुसरून मानवी हक्कांप्रती आदर बाळगण्याची
जबाबदारी ओळखतील.

Walt Disney Company च्या पुरवठा शृंखला मार्गदर्शक (ही“संहिता”) तत्त्वांचे पुरवठादारांनी पालन करणे आवश्यक आहे तसेच लागू कायदे व नियमांचे पालन अंतर्भूत आहे, पण हे त्यांच्यासाठी मर्यादित नाही जे उत्पादन, प्रक्रिया, मूल्य निर्धारण, विक्री, आयात निर्यात आणि उत्पादन घटकांचा कच्चा माल यांच्या वितरणाशी संबंधित आहे व त्यांना याचे पालन करणे आवश्यक आहे. लागू कायदे व नियम या संहितेत आहेत ज्यात स्थानिक व राष्ट्रीय संहिता कायदे आणि नियम, लागू प्रतिबंध आणि ऐच्छिक व्यवसाय दर्जा यांचा अंतर्भाव आहे. येथे स्थानिक व्यवसायाचा दर्जा हा लागू कायदे व नियम यांपेक्षा उच्च किंवा शिस्तबध्द असू शकतो. त्यासाठी पुरवठादारांनी उच्च दर्जा गाठायला पाहिजे.

ही संहिता सर्व पुरवठादारांनी पाळणे आवश्यक आहे जे Walt Disney Company च्या कोणत्याही उत्पादक, दुय्यम उत्पादनाशी संबंधित आहेत.


©DISNEY

# मानवी व कामगारांचे हक्क

## मानवी हक्क

पुरवठादार हा संयुक्त राष्ट्र संघाच्या Guiding Principles on Business and Human Rights तत्त्वांशी परिचित असावा आणि त्याने मानवी अधिकारांवरील प्रतिकूल परिणामांवर व त्यांच्या कृतीतून किंवा त्याच्या व्यावसायिक मैत्रीतून थेट काम, उत्पादन किंवा सेवांतून होणाऱ्या परिणामांवर मेहनतीने प्रतिबंध घालावा, असे परिणाम ओळखावे व ते सौम्य करावे.

## बाल कामगार

पुरवठादारांना बाल कामगार ठेवण्यास सक्त मनाई आहे. यात वय वर्षे 15 पेक्षा कमी असलेल्या, स्थानिक कायदेशीर नोकरी संदर्भातील वयोमर्यादेपेक्षा कमी वय असलेला, अनिवार्य शिक्षणासाठी आवश्यक वयापेक्षा कमी वय असलेल्यांचा समावेश आहे.

## वेठबिगार

पुरवठादारांनी जबरदस्तीने किंवा इच्छेविरुद्ध काम करण्यास कामगारांचा वापर करू नये. वेठबिगार किंवा अनिच्छेने काम करण्यात कोणत्याही माणसाने एखाद्या जुलूमाच्या आधीन किंवा शिक्षा म्हणून केलेले काम,  ज्यासाठी सदर व्यक्ती स्वेच्छेने जाऊ इच्छित नाही याचा अंतर्भाव आहे. उदाहणादाखल यात समाविष्ट असलेले परंतु ज्यांच्यापुरते हे मर्यादित नाही असे तुरुंग, बंधपत्रित, करारनामा असलेले किंवा काम करण्यास भाग पाडलेले कामगार. वेठबिगारांमध्ये पुढील जणांचा समावेश होतो असुरक्षिततेचा फायदा घेऊन, फसवणूक, हालचाल किंवा संचारास निर्बंध,  समुहापासून अलग करणे, शारीरिक किंवा लैंगिक छळ, दहशत आणि धमकी, कागदपत्रांची अडवणूक करणे, वेतनचोरी करणे, बंधपत्रित कामगार (कामावर घेण्यासाठीचा मोबदला, अपमानजनक कामाची किंवा राहण्याची परिस्थिती) किंवा जबरदस्तीने किंवा अत्याधिक जास्तीचे काम. जे पुरवठादार स्थलांतरित कामगारांना काम देतात त्यांनी असे कामगार फसवणूक करत कामावर घेणे किंवा कामावर लावण्याच्या बदल्यात मोबदला आकारणे या प्रक्रियांमधून  येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

## भेदभाव

पुरवठादारांना कामगारांना कामावर ठेवताना वेतन, लाभ, उच्च प्रशिक्षण, शिस्त, बडतर्फी किंवा निवृत्ती तसेच कुळ, धर्म, जात, लिंग, रंग, लैंगिकता, लैंगिक इच्छा, लिंगभेद, राष्ट्रीयत्व, सामाजिक अथवा तात्त्विक प्रगती, मागासलेपणा, वय, वैवाहिक स्थिती, दुर्बलता, वंध्यत्त्व, गर्भधारणा, संघटना सभासद, राजकीय प्रभाव किंवा कोणत्याही बेकायदेशीर पद्धतीने भेदभाव करता येणार नाही.

## संघटन स्वातंत्र्य आणि समुहिक मागण्या

पुरवठादारांनी कामगारांच्या कामावर रुजू होणे, कायदेशीर व शांततापूर्ण सामूहिक मागण्यांमधील सहयोग, संघटन, सहभाग या हक्कांचा आदर केला पाहिजे. ते ही कोणत्याही दंडात्मक, छळवणूक, भेदभाव अथवा प्रतिबंधात्मक कारवाई शिवाय. कामगारांना कामावर आपले कौशल्य दाखवण्याची मोकळीक असावी.

## छळणूक आणि मानहानी

पुरवठादारांनी प्रत्येक कामगाराला सन्मानाने व आदराने वागणूक देणे आवश्यक आहे आणि कोणत्याही प्रकारची कामकाजातील शिक्षा, हिंसेची भीती अथवा इतर प्रकारच्या शारीरिक, लैंगिक, मानसिक किंवा शाब्दिक छळणूक किंवा मानहानी केली जाऊ नये. असहाय्य व कमजोर गटावर कल्याणाच्या दृष्टीने जास्त लक्ष दिले पाहिजे. यांत महिला, तरुण कामगार, विस्थापित, दुर्बल लोक यांचा समावेश होत असून यावर काही सीमा नाही.

## आरोग्य आणि सुरक्षितता

पुरवठादारांनी कामगारांचे काम करण्याचे ठिकाण आरोग्यदायी व सुरक्षित ठेवणे अनिवार्य आहे. त्यासाठी कामाच्या ठिकाणी कामादरम्यान उद्भवणाऱ्या अपघात व दुखापतींवर उपचारात्मक व प्रतिबंधात्मक अशा सर्व उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच कामगारांना कामाचे योग्य प्रशिक्षण देणे, रसायनांचा वापर व विल्हेवाट यासंबंधी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. कमीत कमी पुरवठादारांनी कामगारांना सुयोग्य असे विश्रांतीगृह, पिण्यायोग्य पाणी, खाण्यायोग्य अन्न, त्या योग्य जागा, वैयक्तिक सुरक्षेची साधने, सुरक्षित यंत्रसामग्री, अपघात प्रतिबंधक व त्यावर उपायात्मक प्रशिक्षण, योग्य तापमान, मोकळी हवा व पुरेसा उजेड यांची व्यवस्था पुरवणे आवश्यक आहे.

पुरवठादारांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की राहण्याच्या आणि शयनगृहातील सर्व जागा स्वच्छ, सुरक्षित आणि उद्देशासाठी योग्य आहेत. जागा सुरक्षित असणे आवश्यक आहे आणि तेथे प्रवेश करणे आणि तिथून बाहेर पडणे याचे वाजवी स्वातंत्र्य असले पाहिजे.

पुरवठादारांनी कामगारांना समजतील अशा आपत्कालीन सज्जता योजना आणि कार्यपद्धती तयार करणे, देखरेख करणे आणि अंमलात आणणे आवश्यक आहे आणि आग, नैसर्गिक आपत्ती, सुरक्षा आणि आरोग्य-संबंधित घटनांसह उद्भवू शकणाऱ्या विविध आपत्कालीन परिस्थितींना कसा प्रतिसाद द्यायचा ती प्रक्रिया स्पष्टपणे सर्वांना सांगणे आवश्यक आहे. पुरवठादारांनी नियमितपणे इमारतींची रचना भक्कम सुदृढ आहे की नाही याचे मूल्यांकन केले पाहिजे.


©DISNEY

# मानवी व कामगारांचे हक्क

## वेतन आणि फायदे/लाभ

पुरवठादारांनी किमान वेतन, ओव्हरटाइम(ज्यादा काम), पीस रेट(एका कामासाठी असणारा दर) आणि नुकसानभरपाईच्या इतर घटकांसह सर्व लागू असणाऱ्या वेतन आणि फायदे यांच्या कायदे आणि नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

पुरवठादारांनी हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की कामगारांना देण्याची रक्कम--- ओव्हरटाईम(ज्यादा कामाच्या) तासांसाठी कायदेशीररित्या आवश्यक असलेल्या प्रीमियम(उच्च/अधिक) दराने किंवा, कायदेशीररित्या निर्धारित प्रीमियम(उच्च) दर नसल्यास, नियमित तासाच्या वेतनदरापेक्षा जास्त दराने दिला जात आहे.

वेतन रोखणे किंवा त्यात कपात करणे हे कायदेशीर असणे आवश्यक आहे, हे कामगारांना स्पष्टपणे कळवलेले असले पाहिजे आणि ते शिक्षेच्या रूपात किंवा कामगारांच्या हक्कांना बाधा आणण्यासाठी वापरले जाऊ नये.

पुरवठादारांनी कामगारांना कौटुंबिक रजा, आजारपण, आरोग्यसेवा, सुट्टी आणि बेरोजगारी यासह सर्व कायदेशीररीत्या आवश्यक लाभ प्रदान केले आहेत याची खात्री करणे आवश्यक आहे. पुरवठादारांनी खात्री करणे आवश्यक आहे की नियोक्ता योगदान अचूक/योग्य, वेळेवर आणि स्पष्टपणे सांगितलेल्या पद्धतीने दिले गेले आहे.

## कामाचे तास

पुरवठादारांनी सर्व लागू असणारे कामाच्या तासांचे कायदे आणि नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे,  की,नियमित कामाचे तास दर आठवड्याला 48 तासांपेक्षा जास्त नसतील आणि अपवादात्मक परिस्थिती सोडता, ओव्हरटाइमचे(ज्यादा कामाचे) तास दर आठवड्याला 12 तासांपेक्षा जास्त नसतील.

पुरवठादारांनी सलग 6 दिवसांच्या कामानंतर कामगारांना किमान एक दिवस विश्रांती दिली पाहिजे.

## कामगार संवाद आणि करार/प्रतिबद्धता

कामगारांना या संहितेच्या तरतुदी आणि कामगारांचे कायदेशीर हक्क आणि जबाबदाऱ्या कळवल्या गेल्या आहेत आणि त्यांना त्या समजल्या आहेत याची खात्री करण्यासाठी पुरवठादारांनी योग्य ती पावले उचलली पाहिजेत.

पुरवठादारांनी समस्या ओळखण्यात आणि त्यांचे निराकरण करण्यात सक्रिय कामगार सहभागाची सोय केली पाहिजे. पुरवठादारांनी तक्रारींचे आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी यंत्रणा स्थापन करावी. कमीतकमी, पुरवठादारांनी कामाच्या ठिकाणी असलेल्या समस्या ओळखण्यासाठीच्या कामगारांच्या प्रयत्नांमध्ये हस्तक्षेप करू नये.

पर्यावरण

पुरवठादारांनी पर्यावरण संरक्षण आणि नैसर्गिक संसाधने जतन करणे आवश्यक आहे, ज्यात नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्यासाठी आणि कचरा कमी करण्यासाठी टिकाऊ सामग्री आणि उत्पादन पद्धती शोधणे समाविष्ट आहे. यामध्ये हरितगृह वायू उत्सर्जन, पाण्याचा वापर आणि कचरा निर्मिती आणि व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रातील वार्षिक पर्यावरणीय कामगिरीच्या सार्वजनिक अहवालासह पर्यावरणावरील प्रभावांचे मोजमाप, व्यवस्थापन आणि खुलासा यांचा समावेश आहे. पर्यावरणावरील प्रभाव कमी करण्यासाठी लक्ष्य निश्चित करणे आणि कृती योजना लागू करणे यासाठी पुरवठादारांना प्रोत्साहित केले जाते.


©DISNEY

# पशु कल्याण

पुरवठादारांनी पशु कल्याणासाठी असलेल्या स्थानिक मानकांचे पालन केले पाहिजे. जिथे स्थानिक कायदा नाही, तेथे पुरवठादारांना प्राण्यांच्या पर्यावरणीय, वर्तणूक, शारीरिक आणि मानसिक कल्याणासाठी आंतरराष्ट्रीय मानकीकरण संस्थेच्या मानकांचे पालन करण्यास प्रोत्साहित केले जाते ज्यातून उत्पादने, घटक, साहित्य किंवा सेवा प्राप्त केल्या जातात.

# पुरवठा साखळी व्यवस्थापन

धोरणे, पद्धती आणि कर्मचारीवर्ग यांची स्थापना आणि नियमित पुनरावलोकनासह पुरवठादारांनी कामाच्या ठिकाणच्या परिस्थितीचे सतत निरीक्षण करण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी व्यवस्थापन प्रणाली स्थापित केली पाहिजे.

Disney च्या अपेक्षांबाबत पुरवठादारांनी त्यांच्या पुरवठा साखळीमध्ये संवाद साधला पाहिजे आणि संवाद साधण्यासाठी आवश्यक ते सर्व साहित्य आणि सहाय्य प्रदान केले पाहिजे.

पुरवठादारांनी सर्व घटक आणि कच्च्या मालासह त्यांच्या संपूर्ण पुरवठाश्रृंखलेचा मागोवा घेतला पाहिजे आणि त्याचे दस्तऐवजीकरण केले(नोंद केली) पाहिजे आणि विनंती केल्यावर अशी माहिती Disney ला उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

Disney द्वारे आवश्यक असल्यास, पुरवठादारांनी Disney आणि त्याच्या नियुक्त एजंट्सना (तृतीय पक्षांसह) या आचारसंहितेच्या पालनाची पुष्टी करण्यासाठीच्या देखरेख कार्यकृतीमध्ये सहभागी होण्यासाठी अधिकृत करणे आवश्यक आहे, ज्यात सुविधा, इतर कार्यस्थळे आणि नियोक्त्याने प्रदान केलेल्या घरे यांची अघोषित ऑन-साइट (प्रत्यक्ष कामाची ठिकाणे) तपासणी; या संहितेशी संबंधित उपस्थिती, वेतन आणि इतर नोंदींचे पुनरावलोकन; आणि कामगारांशी खाजगी संवाद, जेथे लागू कायद्याद्वारे परवानगी आहे, याचा समावेश आहे.

पुरवठादारांनी या आचारसंहितेचे पालन करत असल्याचे दर्शविण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे जतन केली पाहिजेत आणि उपलब्ध करून दिली पाहिजेत आणि असे दस्तऐवज अचूक, सध्याचे आणि पूर्ण असल्याची खात्री केली पाहिजे.

**अनधिकृत उपकंत्राट/उपकरार**

Disney ने पुरवठा साखळीसंस्था उघड करण्यास सांगितले असल्यास, पुरवठादारांना अशा संस्थांना सामील करून घेण्यासाठी Disney  ची स्पष्ट लेखी संमती घेणे आवश्यक असू शकते.

# नैतिकता आणि जबाबदार व्यवसाय

पुरवठादारांनी लागू असणारे सर्व भ्रष्टाचारविरोधी कायदे आणि लाचलुचपत प्रतिबंधक कायदे, नियम आणि अटी आणि पुरवठादाराच्या Disney सोबतच्या करारांतर्गत त्याच्या कामगिरीशी संबंधित इतर कोणत्याही भ्रष्टाचारविरोधी किंवा लाचलुचपत प्रतिबंधक जबाबदाऱ्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

पुरवठादारांनी फक्त Disney द्वारे स्पष्टपणे अधिकृत केलेली, ज्यात ट्रेडमार्क आणि कॉपीराइटचा समावेश आहे अशी Disney ची बौद्धिक संपदा वापरावी.

# गुणवत्ता आणि सुरक्षितता

पुरवठादारांनी फक्त सर्वोच्च गुणवत्ता मानकांचे पालन करणारी उत्पादनेच आणि सेवा तयार, उत्पादित, प्रक्रिया करणे आणि वितरीत करणे आवश्यक आहे.

पुरवठादारांनी, सुरक्षित आणि हेतूसाठी योग्य असणारी, उत्तम गुणवत्तेची आणि आरेखन, रचना , साहित्य आणि उत्पादन अंमलबजावणीमध्ये दोष नसलेली, उत्पादने आणि सेवा तयार करणे, उत्पादित करणे, प्रक्रिया करणे आणि वितरीत करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, पुरवठादारांनी Disney द्वारे तयार केलेल्या सर्व उत्पादन सुरक्षा मानकांचे पालन करणारी उत्पादने आणि सेवा तयार करणे, उत्पादित करणे, प्रक्रिया करणे आणि वितरीत करणे आवश्यक आहे. पुरवठादार त्यांची पुरवठासाखळी सुरक्षित करण्यासाठी जबाबदार आहेत, ज्यामध्ये वाहतूक, गोदाम, दलाल, एकत्र आणणारे किंवा इतर घटक समाविष्ट आहेत आणि त्यांच्या संपूर्ण पुरवठाशृंखलेमध्ये समर्पक सुरक्षा उपाय आहेत आणि त्यांचे पालन केले जात आहे हे सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार आहेत.


©DISNEY